**प्रेस नोट**

अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.१८.०१.२०२२

आलोसे श्री.मुकेश हरी महाजन, वय–४०, वन क्षेत्रपाल (RFO), वन परीक्षेत्र अधिकारी कार्यालय,रावेर जि.जळगांव रा.वन क्षेत्रपाल यांचे शासकीय निवासस्थान, स्टेशन रोड, रावेर ता.रावेर, मुळ रा.चुंचाळे, ता.चोपडा जि.जळगांव यांनी प्रथम १,३०,०००/– रुपये व तडजोडीअंती १,१५,०००/–रुपये लाचेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जळगांव यांची कारवाई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | घटक | :– | जळगांव |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | :– | रावेर पो.स्टे., गु.र.नं. १७/२०२२ |
| ३ | कलम | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे... |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | :– | श्री.मुकेश हरी महाजन, वय–४०, वन क्षेत्रपाल (RFO), वन परीक्षेत्र अधिकारी कार्यालय, रावेर जि.जळगांव रा.वन क्षेत्रपाल यांचे शासकीय निवासस्थान, स्टेशन रोड, रावेर ता.रावेर, मुळ रा.चुंचाळे, ता.चोपडा जि.जळगांव<br>**(खाते – वन विभाग वर्ग–३)** |
| ५ | मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम | :– | दि.२२.११.२०२१ रोजी वन क्षेत्रपाल यांचे शासकीय निवासस्थान रावेर येथे प्रथम १,३०,०००/–रु.व तडजोडीअंती १,१५,०००/–रु. लाचेची मागणी |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | – |
| ७ | गुन्हा दाखल तारीख | :– | दि.१८/०१/२०२२ |
| ८ | थोडक्यात माहीती | :– | यातील फिर्यादी यांनी जळगांव जिल्ह्यातील वन विभाग खात्याकडुन रावेर तालुक्यातील पाल क.नं.५५, लोहारा क.नं.२४ व जिन्सी क.नं.९ या गावांमध्ये ए.एन. आर रोपवन अंतर्गत चैनलींग फेंन्सींग व गेटच्या कामाचा ठेका घेतला होता. यातील फिर्यादी यांनी पाल येथील व त्यानंतर लोहारा येथील काम पुर्ण केलेले होते. त्यापैकी फिर्यादी यांना पाल येथील केलेल्या कामाचा धनादेश मिळालेला होता. तसेच लोहारा येथील कामाचा धनादेश मिळणे बाकी होता. सदरचा धनादेश मिळणेसाठी फिर्यादी यांनी आलोसे यांची भेट घेतली असता आलोसे यांनी फिर्यादीस मी तुम्हाला पाल येथे केलेल्या कामाचा धनादेश मिळवुन देण्यासाठी अनुकूल अहवाल पाठवुन मदत केलेली आहे. त्यासाठी तुम्ही ५ टक्के प्रमाणे १,३०,०००/–रुपये मला द्या, असे सांगुन आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडेस लाचेची मागणी केली होती. त्याबाबत फिर्यादी यांनी दि.२१.११.२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने पंच साक्षीदारासमक्ष दि.२२.११.२०२१ रोजी आलोसे यांनी फिर्यादी यांचे कडेस फिर्यादीने पाल ता.रावेर येथील वन विभागाचे केलेल्या कामाचा धनादेश मिळण्यासाठी अनुकूल अहवाल पाठवुन मदत केल्याच्या मोबदल्यात ५ टक्के प्रमाणे प्रथम १,३०,०००/–रुपये व तडजोडीअंती १,१५,०००/–रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम मिळवण्याचा प्रयत्न केला म्हणुन गुन्हा. |

लचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री क्रमांक:–** १०६४

**दुरध्वनी क्रमांक:–** ०२५७–२२३५४७७

**व्हॉटसॲप क्रमांक:–** ८७६६४१२५२९

पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

18.1.2022

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**